# मराठा आंदोलन झोपविण्यासाठी जे राजकारण केले त्याचा फटका फडणवीस सरकारलाच बसला!

बीड ● रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ ● वर्ष २० वे ● पाने ४
http://epaper.beedvastav.com https://www.beedvastav.com Email: beedvatsav@gmail.com ● किंमत ३ रुपये

स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

२० वर्ष

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# ओबीसींच्या दणदणीत मोर्चाने चालाखी उघड झाल्याने फडणीस सरकारची पाचावर!

# मराठा, ओबीसी दोघांचीही घोर फसवणूक!!

- पहिल्या जीआरमुळे ओबीसी नाराज झाले आणि त्याबाबतच्या स्पष्टीकरणाने पुन्हा मराठे नाराज होण्याची शक्यता!
- मराठ्यांच्या जीआरबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख नव्हता त्यामुळे सरकारच्या धरसोड वृत्तीमुळे राजकीय गोंधळ उघडाला!!
- ओबीसी मोर्चाला घाबरून मराठ्यांसाठी काढलेला जीआर फक्त मराठवाड्या पुरताच मर्यादित असाल्याचा खुलासा

## आरक्षण प्रकरणात सरकारची संपूर्णत: कोंडी झाल्याचे स्पष्ट





नागपूर : मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले, घाबरलेल्या महाराष्ट्र शासनाने घाईघाईत मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याबाबतचा जीआर काढला, याचीच पुनर्रावृत्ती शुक्रवारी नागपूरात झाली. शासनाच्या जीआर विरोधात ओबीसीने नागपुरात मोठा मोर्चा काढला. सत्ताधाऱ्यांच्या अपेक्षेपेक्षा जास्त गर्दी मोर्चात होती. त्याला घाबरून शासनाच्या वतीने मराठ्यांसाठी काढलेला जीआर फक्त मराठवाड्या पुरताच मर्यादित आहे, असा खुलासा करण्यात आला. पहिल्या जीआरमुळे ओबीसी नाराज झाले आणि त्याबाबतच्या स्पष्टीकरणाने पुन्हा मराठे नाराज होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आरक्षण प्रकरणात सरकारची संपूर्णत: कोंडी झाल्याचे स्पष्ट होत आहे.

### मराठा आंदोलन थोपविण्यासाठी घेतलेला निर्णय फडणवीस सरकारच्या अंगलट!!

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात जरांगे यांनी मुंबई गाठली. आरक्षण मिळेपर्यंत मुंबई सोडणार नाही, अशी घोषणा केली. सरकारने दबावाखाली येऊन 22 सप्टेंबर 2025 रोजी एक जीआर काढून मराठ्यांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय मराठा आंदोलन थोपविण्यासाठी घेतला गेला होता. या जीआरमुळे ओबीसी समाजात तीव्र नाराजी पसरली. त्यांना वाटले की, यामुळे त्यांचे ओबीसी आरक्षण धोक्यात येईल पण सत्ताधारी पक्षातील ओबीसी नेते आणि सरकारच्या दावणीला बांधलेल्या ओबीसी संघटनांकडून तातडीने सरकारच्या निर्णयाचे स्वागत केले.

### मराठा, ओबीसी या दोन्ही समाजाला शांत केले हा समज अल्पकालीन ठरला!

मराठा आणि ओबीसी या दोन्ही समाजाला आपण शांत केले असा समज सरकारमधील धुरिणांचा झाला. श्रेय वादाच्या जाहिराती प्रकाशित झाल्या पण ते अल्पकालीन ठरले. काही संघटनांनी सरकारची चालाखी ओळखली जीआर मधील झालेले शब्द बदल हे मराठ्यांना सरसकट ओबीसी करण्यासाठीच करण्यात आले, हे स्पष्ट झाले. त्यामुळे त्यांनी सरकारच्या दोन सप्टेंबरच्या जीआरच्या विरोधात भूमिका घेतली. ओबीसी आरक्षण संकटात असल्याचे हाक दिली. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यासाठी पुढाकार घेत 10 ऑक्टोबर रोजी नागपुरात मोर्चा काढण्याची घोषणा केली.

### ओबीसींच्या हजारोंच्या मोर्चाच्या दबावामुळे फडणवीस सरकार हादरले!

मराठ्यांच्या आंदोलनामुळे गोंधळलेले सरकार ओबीसींच्या हजारोंच्या मोर्चाच्या दबावामुळे हादरले महसूल मंत्री बावनकुळे यांनी मराठ्यांसाठी काढलेला जीआर फक्त मराठवाड्या पुरताच मर्यादित आहे असे जाहीर केले पण जीआरमध्ये असा कोणताही स्पष्ट उल्लेख नव्हता त्यामुळे सरकारची धरसोड वृत्ती आणि राजकीय गोंधळ उघड झाला. सरकारने मराठा आंदोलन झोपविण्यासाठी जे राजकारण केलं त्याचा फटका आता त्यांनाच बसतोय ओबीसींची नव्याने एकजूट झाली आहे सरकारची चालाखी उघड झाली आहे आणि या सर्व थोडक्यात मराठा व ओबीसी दोघांच्याही फसवणुकीसारखाच वाटते.

### अपेक्षेपेक्षा जास्त गर्दी झाल्याने नागपुरातील मोर्चा दणणदणीत झाला!

मोर्चा प्रभावी होणार नाही, वडेट्टीवार यांना मानणारा वर्ग, कार्यकर्ते नागपुरात नाही. मोर्चा यशस्वी करण्यासाठी लागणारी यंत्रणा नाही, काँग्रेसमधील नेत्यांमधील वाद लक्षात घेता त्यांना त्यांच्याच पक्षातून सहकार्य मिळणार नाही, इतर पक्षांचे ओबीसी नेते त्यांच्यासोबत येणार नाही, असे एक नव्हे तर अनेक कारणे दहा तारखेला मोर्चा यशस्वी होणार नाही यासाठी दिले जात होते.

मोर्चाच्याच काही दिवस आधी महसूलमंत्र्यांनी प्रत्येक जिल्ह्यात ओबीसी वस्तीगृहे बांधण्याची अनेक वर्षांपूर्वीची घोषणा नव्याने केली. ऑनलाईन आढावा बैठक घेतली. या निर्णयाची प्रसिद्धीही करून घेतली. भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारच ओबीसींचे कसे तारणहार आहे हे बावनकुळे रोज नागपुरात येवून सांगू लागले. पण एवढे सर्व करूनही नागपुरातील मोर्चा दणदणीत झाला. अपेक्षेपेक्षा मोठी गर्दी जमली. ओबीसी समाजाने एकजूट दाखविली.

वाहतुकीस अडथळा ➤ तळीरामाचा केज पोलिसांनी तात्काळ बंदोबस्त करण्याची जनतेची मागणी

# केज शहरातील शासकीय कार्यालयामोरच तळीरामाचा भर रस्त्यात हैदोस!

➤ केज : वसंत सोनवणे

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यासह शहरात जागोजागी तळीरामाने उच्छाद मांडला आस्ताना शहरात जागोजागी मटका, गुटखा, हातभट्टी दारू, गल्लीबोळामध्ये सर्रासपणे देशी दारू यासह अवैध प्रवासी वाहतूक सर्रास सुरू असताना केज पोलिस या कडे कानाडोळा करत असुन अवैध धंदे करण्यासाठी मुक संमती देत आहेत की काय? असे नागरिकांमधून बोलताना दिसते, भर रस्त्यावर तर काल तर एका तळीरामाने भर रस्त्यावर उच्छाद मांडला होता.

हा व्यक्ती दारुच्या नशेत केज पंचायत समितीच्या प्रवेशद्वारासमोर रस्त्यावर मधोमध मांडी घालून बराच वेळ बसला काही नागरिकांनी त्याला ओढून बाजुला केले. परंतु तो पुन्हा तर रस्त्यावर आडवा झोपला यामुळे रस्त्यावरील ठप्प होवुन वाहानांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

समोर पंचायत समिती कार्यालय, त्याच्या विरुद्ध बाजूस तहसील कार्यालय, त्याच्या बाजुला केज पोलीस स्टेशन आणि त्या समोर न्यायालय अशी शासकीय कार्यालये असताना एखादा

**रस्ता झाला जाम; मात्र प्रशासनाला फुटेना घाम**



व्यक्ती भर रस्त्यावर आडवा झोपुन वाहतुक आडवुन वाहतुकीस अडथळा निर्माण करतो. मग केजची पोलीस यंत्रणा आहे कुठे? शहरात बसवलेले सीसीटीव्ही कॅमेरे शोभेसाठी बसवले आहेत काय? असाही प्रश्न उपस्थित होवु लागला आहे. ● पान ४ वर...

## रजापूर येथील आत्महत्याग्रस्त कुटुंबियास विलास बापू प्रतिष्ठानच्यावतीने एक लाखाची रोख मदत

➤ पैठण : सर्जेराव खडसन

पैठण तालुक्यातील रजापूर येथील शेतकरी सोनू मोहन गोर्डे यांनी नापिकीला कंटाळत विषारी द्रव्य प्राशन करून विहिरीत उडी मारून आत्महत्या केली होती. अनाथांचे नाथ, राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार विलास बापू प्रतिष्ठानच्यावतीने आत्महत्या केलेल्या गोर्डे यांच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची रोख मदत सुपूर्द करन्यात आली. सदरील मदत ही छत्रपती संभाजी नगरचे खा. संदीपान भुमरे, व आमदार विलास भुमरे यांच्या माध्यमातून करण्यात आली.

रजापुर येथील शेतकरी सोनु महेश गोर्डे यांनी दि. १६ सप्टेंबर रोजी नापिकीला कंटाळून विषारी द्रव प्राशन करून विहिरीत उडी मारून आत्महत्या केली होती. सदर घटनेची माहिती अनाथनाचे नाथ म्हणून सर्वत्र ओळखले जाते असे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळाली असता त्यांनी अत्महत्यग्रत गोर्डे कुटुंबियांशी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधून त्यांचे सांत्वन करत तुमच्या दु:खात शिवसेना व मी सदैव तुमच्या पाठीशी उभे आहोत, असे सांगितले. तद्नंतर छत्रपती संभाजी नगरचे खा. संदीपान भुमरे, व आमदार विलास भुमरे यांनी विलास बापू प्रतिष्ठानच्या माध्यमातून आत्महत्याग्रस्त गोर्डे कुटुंबीयास एक लाख रुपयांची रोख मदत करण्यात आली.



नगरसेवक भूषण कावसानकर, मार्केट कमिटीचेकमिटीचे माजी सभापती विलास गोरे, खरेदी-विक्रीचे संचालक सोपान थोरे यांच्यासह सरपंच योगेश कोढुळे, विनोद राठोड, नवनाथ सांगळे, रामनाथ डिघुळे, अंबादास कोरडे, आसाराम गोर्डे, रमेश गोर्डे, विजय थोरे, परमेश्वर चौधरी, अरुण कळमकर, महादेव भिसे आदींसह गावकरी उपस्थित होते.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# गंगापुरातील पंतप्रधान आवास योजनेतुन सर्वांसाठी घरे योजनेंअंतर्गत 591 घरकुलांच्या कामात घोटाळा : समाजसेवक राहुल वानखेडे

## डम्पिंग ग्राउंडजवळ गरिबांचे घरकुले





**गंगापूर : गुलाब वाघ**

नगरपरिषदेअंतर्गत गंगापूर शहरातील लासूर रोडवरील गायरान जमिनीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पंतप्रधान आवास योजनेतुन सर्वांसाठी घरे योजनेंअंतर्गत 591 घरकुलांचा भव्य प्रकल्प योजनेच्या प्रत्यक्ष कामाचा शुभारंभ 2020 मध्ये सुरु करण्यात आला होता सदर घरकुल योजनेतील सर्व घरे बांधकाम करण्यासाठी समरथ मल्टीबीज इंडिया प्रा. ली. गारखेडा परिसर औरंगाबाद या कंपनीला ठेका देण्यात आला आहे.

सदर समरथ मल्टीबीज इंडिया प्रा. ली. या कंपनीने अत्यन्त धिम्या गतीने घरकुल बांधकामास सुरवात केली होती हे काम सद्यस्थितीतही कासवगतीने चालू असून सदर कंपनीला बांधकामाचे बिल देयके अदा करताना म्हणजेच देताना गंगापूर नगरपालिका प्रशासनाने नियमाची पायमल्ली केली असून एकूण आतापर्यंत झालेल्या बांधकामापेक्षा पाच पट जास्त बिल देण्यात आलेले आहे सदर बिल देताना तात्कालीन प्रभारी मुख्याधिकारी/ प्रशासक नंदकिशोर भोंबे हे होते व सर्वात महत्वाची बाब म्हणजे तात्कालीन वेळी गंगापूर नगरपरिषदेला लेखाधिकारी अकाउंटंट हजर नसताना नसताना नगरपालिकेतील लिपिक प्रशांत लांडे यांनी सदर घरकुल योजनेचे बांधकामा पेक्षा जास्तीचे एकूण 3 कोटी 54 लाख रुपयाची बनावट बिले स्वत: बनवले व तात्कालीन मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्या आदेशाने सदरील समरथ मल्टीबीज कंपनीला अदा केले, व सदरील योजनेबाबत आता गंगापूर नगरपरिषद माहिती देण्यास टाळाटाळ करत आहे.

एकूणच गंगापूर नगरपरिषदेतील मुख्याधिकारी व कर्मचारी व सदरील कंपनीने संगनमत करून एकूण कामाच्या पाचपट जास्त बनावट बिले तयार करून या घरकुल योजनेत कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केला. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचना वतरतुदी व नियमावली याची पूर्णत: पायमल्ली करण्यात आली आहे तसेच या योजनेत भ्रष्टाचार करून गोरगरीबांच्या घरकुल योजनेचा पैसा लाटला आहे. या संदर्भात दिनांक 13/09/2023 रोजी कारवाईसाठी तात्कालिक जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले परंतु कुठलीही कारवाई जिल्हाधिकारी यांनी अद्यापही केलेली नाही. सदरील घरकुल योजनेत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या समरथ मल्टीबीज इंडिया कंपनी व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी व सदरील योजनेतील बांधकामापेक्षा जास्त 3 कोटी 54 लाख रुपये दिलेल्या बनावट बिलाची चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी अशीही मागणी समाजसेवक राहुल वानखेडे यांनी वारंवार लेखी निवेदनद्वारे केली आहे मात्र अद्यापही नगरपालिका, जिल्हापरिषद, जिल्हाधिकारी यांनी केलेली नाही त्यामुळे गरिबांच्या घरकुलावर डल्ला मारण्याचे काम संगनमतीने चालू आहे असाही आरोप वानखेडे यांनी केला आहे.



### नगरपालिकेचे नगरसेवक होण्यासाठी अनेकांचे गुडघ्याला बाशिंग बांधून लक्ष मात्र गरिबांच्या घरकुलाकडे दुर्लक्ष

गंगापूर शहर मध्ये लातूर रोडवर 591 गरीब लोकांसाठी पंतप्रधान आवास योजना अंतर्गत सर्वांसाठी घरे या योजनेचा 2020 साली मोठा गाजावाजा करून उद्‌घाटन सोहळा पार पडला मात्र अध्यापपर्यंत घरकुले पूर्णत्वकडे गेलेली नाहीत लोकप्रतिनिधी याकडे सर्रासपणे दुर्लक्ष करत आहेत आगामी काही महिन्यात नगरपालिकेची पुन्हा निवडणूक होत आहे यामध्ये अनेकांनी गुडघ्याला बाशिंग बांधून नगरसेवक नगराध्यक्ष होण्याचे स्वप्न पाहत आहे मात्र गोरगरिबाच्या स्वप्नातील घरे पूर्ण करण्याकडे कोणाचेही लक्ष नाही त्यामुळे लवकरात लवकर पूर्ण करण्याची आशा गोरगरीब जनता लोकप्रतिनिकडे करत आहे.

# शहरातील बायपास वळणावर दोन पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्ता जोडणीच्या कामाला सुरुवात

## आ. संदीप क्षीरसागर यांच्या पाठपुराव्याला यश



**बीड : प्रतिनिधी**

बीड शहरातून जात असलेल्या आणि उत्तर दक्षिण जोडणारा धुळे सोलापुर महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक असते. यात जड वाहतकीचे प्रमाण देखील जास्त असते. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बायपास रस्त्यावरील शहरात वळणावर नेहमी अपघात होत होते.

यामुळे संभाव्य अपघात टळले पाहिजेत आणि नागरिकांचे जीव वाचले पाहिजेत त्यामुळे या वळणावर पुलांची बांधणी आणि स्लिप सर्विस रस्त्याची जोडणी अत्यंत महत्त्वाची होती. त्या दोन्ही ठिकाणी पुलांची बांधणी व १२ किलोमीटर च्या रस्त्यावर स्लिप सर्व्हिस रस्ता जोडणीच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात झाली. या कामासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी केंद्रीय रस्ते विकासमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. बीड विधानसभेचे आ. संदीप भैया क्षीरसागर यांनी या सुरू झालेल्या कामाच्या ठिकाणी जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी कामासंदर्भात संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचना करत व सुरू झालेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी सूचना दिल्या.

आ. संदिप क्षीरसागर व माजी आमदार सय्यद सलीम यांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये या विषयामध्ये पीआयएल दाखल होती.

# निकृष्ट रस्त्यामुळे मणक्यांचे आजार अन् वाहनांचा झालेला खुळखुळा : सुरेश पाटील



अंमळनेर : प्रतिनिधी

महाराष्ट्रात लवकरच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर होणार असून जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य पदासाठी अनेक आजी-माजी आणि नवखे उमेदवार कामाला लागले आहेत. अंमळनेर गटात अनेक वर्षापासून कायम समस्या आहेत त्याच समस्या आजी सदस्याला पूर्ण करता आल्या नाहीत. तसेच मंत्री व आमदारांच्या मदतीने अनेक कामात भ्रष्टाचार करून लोकांना फसवणारे, शासकीय कामात भ्रष्टाचार करून स्वत:च्या तुंबड्या भरणारे उमेदवार बाशिंग बांधून मीच उमेदवार कसा होणार हे सांगताना दिसत आहेत. जिल्हा परिषद गटामध्ये गेली अनेक वर्षे विविध पक्षाचे उमेदवार निवडून दिले परंतु त्यांनी या गटात कोणताही विकास केलेला नाही.

फक्त स्वत:चा व नातेवाईकांचा विकास केलेला आहे. रस्त्याच्या बाबतीत तर सांगायचे झाले तर अनेक रस्त्यांचे काम निकृष्ट करणारे आणि करून घेणारे असे दोनही दोषी असून अनेकांना मणक्याचे आजार जडलेले आहेत तर कर्ज काढून घेतलेल्या वाहनांचे खुळखुळे झालेले आहे. सर्वस्वी निकृष्ट रस्ते करणारे आणि करवून घेणारे दोन्हीही दोषी असून अशया लोकांना आपण पुन्हा निवडून दिल्यास आपल्या समस्या जशया आहेत तस्याच दिसतील म्हणून अंमळनेर गटाचा विकास करावयाचा असल्यास भ्रष्टाचारी आणि जनतेच्या पैशावर श्रीमंत झालेल्या उमेदवारांना पसंती न देता सर्वसामान्य शेतकरी पुत्राला पसंती द्यावी असे आव्हान शिव संघर्ष ग्रुप महाराष्ट्र राज्याचे पदाधिकारी तथा ज्येष्ठ पत्रकार सुरेश पाटील यांनी अंमळनेर गटातील मतदारांना केले आहे. जातीपातीच्या राजकारणामुळे आपल्या गटाचा विकास तर खुंटतोच परंतु सामाजिक भान आणि ज्ञान असलेल्या माणसाला निवडून दिल्यास अनेक जिल्हा परिषद गटातील समस्या दूर करण्यास मदत होऊ शकते. जातीपातीचा उमेदवार न निवडता सर्वसामान्य गरीब कुटुंबातील उमेदवार निवडल्यास त्याला सर्वसामान्यांचे दु:ख समजते आणि तो आपल्याला कोणत्या क्षणी मदत करू शकतो. याचा विचार या गटातील लोकांनी करावा अशी विनंतीही सामाजिक कार्यकर्ते सुरेश पाटील यांनी केली आहे.

# सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ केज तहसील कार्यालयासमोर निदर्शने



केज : प्रतिनिधी

सरन्यायाधिष भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या निषेधार्थ सोमवार रोजी केज तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहे तरी केज तालुक्यासह शहरातील बौद्ध समाज बांधवांनी व संविधान प्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन दलित चळवळीतील सर्व संघटना व पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. त्यासंबंधी तहसीलदार केज यांना दलित चळवळीतील सर्व संघटना व सर्व पक्षीय प्रमुख पदाधिकारी यांच्यावतीने लेखी निवेदन देण्यात आले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर एका मनोवादी विचारसरणीच्या वकिलाने न्यायालयात हल्ला केला. हा हल्ला म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेवर केला असून या निंदनीय घटनेचा केज तालुका सर्व दलित संघटना, व सामाजिक संस्था यांच्या वतीने दिनांक१३ ऑक्टोबर २०१५ रोजी सकाळी अकरा वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून निघून तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार आहेत. अशा मनुवादी विचारसरणीच्या हल्लेखोरावर कठोर कारवाई करण्या संदर्भात योग्य ती कारवाई करण्यात यावी. या मागणीचे लेखी निवेदन तहसीलदार केज यांना देण्यात आले आहे. सदर निवेदन हे तहसीलदार राकेश गिड्डे यांनी स्वीकारले आहे. या लेखी निवेदनावर चंद्रकांत खरात सर, दीपक कांबळे, अशोक गायकवाड, लखन हजारे, गौतम बचुटे, तात्या गवळी, आम्रपालीताई गजेशीव, आश्रुबा खरात, कपिल मस्के, दिलीप बनसोडे, बाळासाहेब जाधव, विवेक बनसोड, किरण जोगदंड, समाधान बुचुटे, किरण कसबे इत्यादीच्या स्वाक्षऱ्या आहेत. सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील झालेल्या हल्ल्याचा निषेध व्यक्त करून घोषणाबाजी करण्यात आली.

# परळी येथील आश्रमात झालेल्या घटनेचा शिवक्रांती सेनेच्यावतीने जाहीर निषेध



बीड : प्रतिनिधी

परळी येथे बालकाश्रम शाळेत तेथे शिक्षण घेत असलेल्या लहान मुलांना अज्ञात व्यक्तींनी मारहाण केली व वारकरी संप्रदाय चे टाळ मृदंग व ईतर साहित्य याची तोड फोड करत नुकसान केले यावरच न थांबता त्या कोवळ्या मुलांना बैटिने अमानुष मारहाण करून जखमी केले बीडच्या परळी शहरात गुरुकुलात घुसून ११ विद्यार्थ्यांना बेल्ट व बांबूने जबर मारहाण ही अत्यंत धक्कादायक असुन नर्मदेश्वर गुरुकुलात अध्यात्माचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मारहाण करण दुर्दैवी आहे संबंधित आरोपीवर कठोर शासन होणे गरजेचे आहे असे शिवक्रांती सेना संघटनेचे बीड जिल्हा अध्यक्ष विशाल इंगोले यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# श्री.खोलेश्वर माध्यमिक विद्यालय शांतता पुरस्काराने सन्मानित; सुरेखा काळे नेशन बिल्डर पुरस्काराने सन्मानित






अंबाजोगाई : प्रतिनिधी

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी च्या वतीने जागतिक शांतता सप्ताहाच्या व शिक्षक दिनाच्या निमित्ताने नेशन बिल्डर व शांतता पुरस्कार सोहळ्याचे आयोजन दि.०९ ऑक्टोबर रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोट्रीयन प्रवीण देशपांडे, तर सन्माननीय प्रमुख अतिथी म्हणून श्री. महेश पाटील हे उपस्थित होते. तर मंचावर रोटरी क्लब च्या अध्यक्षा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, प्रोजेक्ट मॅनेजर संतोष मोहिते यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात शिक्षक दिनाच्या निमित्ताने देण्यात येणारे नेशन बिल्डर पुरस्कार वितरण करण्यात आले यात विद्यालयातील सामाजिक शास्त्र विषयाच्या विद्यार्थी प्रिय शिक्षीका सुरेखा काळे यांना या पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याच बरोबर जागतिक शांतता सप्ताहाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात सक्रीय सहभाग नोंदविल्याबद्दल शाळेला सुध्दा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी पुरस्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले आणि पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे यांनी मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार स्विकारला.

विद्यालयास व सुरेखा काळे यांना मिळालेल्या पुरस्कारांबद्दल त्यांचे अभिनंदन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्रजी आलुरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंतजी वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांतजी मुळे, खोलेश्वर शैक्षणिक संकुलातील सर्व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य, स्थानिक व्यवस्था मंडळाचे अध्यक्ष डॉ अतुल देशपांडे, स्थानिक व्यवस्था मंडळाचे कार्यवाह किरण कोदरकर, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष अविनाश मुडेगांवकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगळे, पर्यवेक्षक सुर्यकांत उजगरे, पर्यवेक्षिका रूपाली मुळे, अभ्यासपुरक मंडळ प्रमुख श्रीकांत देशपांडे, ज्योती शिंदे व सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले आहे

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक - अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद-विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

# सिया गावडे यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील मुलांमध्ये शालेय साहित्य वाटप






➤ **आष्टी : प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील निमगाव बोडखा गावचे युवा उद्योजक किरण तुकाराम गावडे व प्रगती किरण गावडे यांची कन्या सिया किरण गावडे यांचा प्रथम वाढदिवस 'अभिष्टचिंतन' सोहळा विद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत साजरा करण्यात आला. या प्रसंगी जिल्हा परिषद शाळेतील तसेच विद्यालयातील मुला-मुलींना शालेय साहित्य, पेन-पेन्सिल, नोटबुक व फळे वाटप करण्यात आली.

या कार्यक्रमात गावातील उपसरपंच ईश्वर भाऊ मेटे, ग्रामसेवक विकास गावडे, जि.प. शाळेचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब गावडे, राहुल गावडे, अशोक शेलार, शांतीलाल गावडे, शांतीलाल मेटे, सुशांत मेटे, सुनील गावडे, विवेक गावडे, संस्कार गावडे, अशोक मेटे, विराज गावडे, विवेक शिंदे, गणेश गावडे, उद्धव गावडे, तुकाराम गावडे, दादासाहेब गावडे, श्री विठ्ठल विद्यालयाचे मुख्याध्यापक निमोणकर सर, घुमरे सर, सायबर सर, जाधव सर, बोडके सर, नालकोल सर, यादव सर, विधाते सर, राहुल गावडे सर, प्रा. माळशिकारे मॅडम, सविता हगारे, सोनाली गावडे, कानिफ वाळके, शिवाजी घोंगडे, जिल्हा प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक जगताप सर, अमृते सर, अंगणवाडी सेविका शैलाताई गावडे, मदतनीस सोनाली मेटे, आरोग्य सेविका बेबीताई खान, जायदाबी खान तसेच विद्यालयातील व जिल्हा परिषद शाळेतील सर्व लहान मुले-मुली उपस्थित होती.

या सर्वांच्या उपस्थितीत मोठ्या आनंद-उत्साहात व साधेपणाने युवा उद्योजक किरण गावडे (किरण भाऊ) यांच्या संकल्पनेतून त्यांच्या मुलीचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

## लऊळ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**सद्‌गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चा उपक्रम**



➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने सद्‌गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित माजलगाव तालुक्यातील लऊळ येथे मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.

या आरोग्य तपासणी शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्‌गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ मोहन गौरकर, डॉ कृष्णा खैरनार तसेच डॉ यशवंत राजेभोसले, डॉ अशोक घुबडे, सरपंच लक्ष्मण सरवदे, द्वारकादास शिंदे (चेअरमन- सेवा सहकारी सोसायटी), बारिकराव शिंदे (संचालक- सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना), अण्णासाहेब शिंदे (व्हाइस चेअरमन- सेवा सहकारी सोसायटी), काशिनाथ सरवदे (सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक), रामभाऊ शिंदे (ग्रामसेवक), राजेंद्र भंडारी (संचालक- सेवा सहकारी सोसायटी), डॉ सीमा बाहेती, डॉ शिल्पा हुमारी तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटरची टीम उपस्थित होते. यावेळी डॉ मोहन गौरकर यांनी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे उपक्रम व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या शिबीराचे प्रास्ताविक डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले. या शिबिरात बीपी, शुगर, नाडी परीक्षण, इसीजी, फेजिओथेरेपी इत्यादी सुविधा मोफत देण्यात आल्या या शिबीराचा शहरातील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला.

## नाट्य कलावंत शालिक पवार यांचे दु:खद निधन




➤ **चिंचोली लिंबाजी :** येथील नाट्य कलावंत शालिक (आंबा) शंकर पवार यांचे दु:खद निधन चिंचोली लिंबाची सचिन गुरव कन्नड तालुक्यातील चिंचोली लिंबाजी येथील रहिवासी असलेले शालिक शंकर पवार यांचे आज रविवारी दहा वाजून पंधरा मिनिटांनी राहत्या घरी दु:खद निधन झाले त्यांच्या पश्चात पत्नी, तिन भाऊ, दोन मुले, एक बहीण, नातवंडे सुना असा परिवार आहे. शालिक आबा या नावाने प्रख्यात असलेले शालिक पवार यांचा स्वभाव हा मनमिळाऊ होता चिंचोली येथील अनेक नाट्य स्पर्धेत त्यांचा दिमागदार सहभाग होता. परमानंद गिरी महाराज यांचे ते प्रिय शिष्य होते गावातील आध्यात्मिक व धार्मिक कामात त्यांचा नेहमी मोलाचा सहभाग असायचा त्यांच्या जाण्याने परिसरातील अध्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात एक चांगला व्यक्ती गेल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

## पोलिस अधीक्षक साहेब शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडलंच आहे; निदान बालकांच्या मनातील दहशत तरी संपवा : डॉ. गणेश ढवळे

**बीड : प्रतिनिधी**

बीडचे पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांनी पवनचक्की कंपन्यांची बाजू घेऊन शेतकऱ्यांची आर्थिक आणि मानसिक पिळवणूक सुरू ठेवण्यासाठी शेतकऱ्यांना अक्षरश: वाऱ्यावर सोडलं आहे, असा गंभीर आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.



डॉ. ढवळे म्हणाले, "खाकी वर्दीचे ब्रीदवाक्य 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' आहे. या ब्रीदवाक्याचा सन्मान राखण्यासाठी तरी पोलिस प्रशासनाने निष्पाप बालकांवर हल्ला करणाऱ्या गुंडांची शहरभर धिंड काढावी."

अलीकडेच परळी तालुक्यातील नर्मदेश्वर गुरूकुलात अध्यात्माचे शिक्षण घेणाऱ्या ११ विद्यार्थ्यांवर बेल्ट आणि बांबूने निर्दय मारहाण करण्यात आली. या मुलांच्या अंगावर जखमेच्या खुणा उमटल्या आहेत. हल्लेखोरांनी गुरूकुलातील अध्यात्मिक साहित्य, मृदंगासह शैक्षणिक ग्रंथांची तोडफोड केली असून मोठे नुकसान केले आहे.

"अध्यात्म आणि संस्काराचे धडे घेणाऱ्या बाल वारकऱ्यांवरील हा हल्ला अत्यंत दुर्दैवी आहे. गुरूकुलात हैदोस घालणाऱ्यांनी मुलांच्या मनात निर्माण केलेली भीती आणि दहशत पोलिस अधीक्षक नवनित कांवत यांच्या निदर्शनास येईल काय? आणि त्यांनी या घटनेची कठोर कारवाई करावी का नाही?" असा सवाल डॉ. गणेश ढवळे यांनी उपस्थित केला आहे.

## मराठी भाषेला अभिजात दर्जा दिल्यामुळे महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ सशक्त होईल : गणेश खेडेकर






➤ **मुंबई : प्रतिनिधी**

अभिजात भाषा सप्ताह दिन ०३ ऑक्टोंबर ते ०९ ऑक्टोबर. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ, कामगार कल्याण केंद्र सान्ताक्रुझ. आयोजित कार्यक्रमात समाज भूषण आपला माणुस गणेशभाऊ खेडेकर जनसेवक यांना प्रमुख वक्ते म्हणून प्राचारण करण्यात आले. सदर कार्यक्रमात खेडेकर यांनी अभिजात भाषा संदर्भात सविस्तर माहिती सांगितली. जसे अभिजात मराठी भाषा दिवस ०३ ऑक्टोबर रोजी असतो. अभिजात भाषा म्हणजे अती प्राचीन भाषा, जिचा स्वत:चा समृद्ध आणि स्वतंत्र साहित्यिक व सांस्कृतिक वारसा आहे, जी हजारो वर्षांपासून अस्तित्वात आहे. तिचे मूळ स्वरूप अजूनही टिकून आहे. भारत सरकारने अनेक भाषांना या निकषांवर आधारित अभिजात भाषेचा दर्जा दिलेला आहे, जसे की तमिळ, संस्कृत, कन्नड, तेलगू, मल्याळम, ओडिया आणि आताच मराठी, पाली, प्राकृत, आसामी व बंगाली या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा देण्यात आले आहे. केंद्र सरकार अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी काही निकष ठरवते भाषा प्राचीन असावी, भाषेचे वय साधारणपणे दीड ते अडीच हजार वर्षांहून अधिक जुने असावे. साहित्य श्रेष्ठ असावे भाषेमध्ये प्राचीन आणि उच्च प्रतीचे साहित्य निर्माण झालेले असावे. भाषेला स्वत:चे स्वयंभू आणि स्वतंत्र अस्तित्व असावे. आधुनिक रूपातील मूळ गाभा कायम असावा प्राचीन भाषेचे आधुनिक रूप असले तरी, त्यातील मूळ गाभा कायम टिकून राहावा. अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने भाषेच्या समृद्ध परंपरेला आणि सांस्कृतिक वारशाला मान्यता मिळते. यामुळे त्या भाषेला जागतिक स्तरावर ओळख मिळते आणि तिच्या जतन व विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात. उदाहरणे भारतात तमिळ ही पहिली अभिजात भाषा म्हणून मान्यताप्राप्त भाषा ठरली. अलीकडेच मराठीलाही अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे, ज्यामुळे तिच्या ऐतिहासिक परंपरा, साहित्यिक योगदान आणि सांस्कृतिक वारसा यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने होणारे फायदे केंद्रात आणि राज्यांमध्ये संशोधन केंद्रे उभारू शकतो, प्राचीन ग्रंथांचे जतन करून शकतो, त्यांचे भाषांतर करू शकतो, डिजिटायझेशन आणि प्रकाशन करू शकतो, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळतात, शैक्षणिक, संशोधन क्षेत्रात रोजगाराच्या संधी निर्माण होतात आणि बहुतेक दोन वर्षांत या निर्णयाची अंमलबजावणी होते. तसेच प्राथमिक अंमलबजावणी सांस्कृतिक मंत्रालयाकडून होते. भारतातील ४०० हून अधिक विद्यापीठांत मराठी भाषा शिकविली जाऊ शकते. आणि यामुळे महाराष्ट्रातील ग्रंथालय चळवळ सशक्त होईल असे महत्वपूर्ण मार्गदर्शन उपस्थितांना गणेशभाऊ खेडेकर यांनी दिले. व्यासपीठावर समाज सेविका सौ. अंकीता तोंडवळकर. केंद्र प्रमुख सौ. सुष्माताई सावरटकर, आणि केंद्र सेवक मजर खान, यांनी उपस्थितांना पुष्पगुच्छ आणि मानसन्मान देऊन स्वागत केले. कार्यक्रमानंतर चहा पाण्याचा देखील कार्यक्रम खुप छान झाला. केंद्र प्रमुख सौ. सावरटकर यांनी मार्गदर्शन तत्पर माहिती देऊन उपस्थितीताचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली

## विषारी कफ सिरपमुळे २३ चिमुरड्यांचा मृत्यू, कंपनीच्या संचालकाला अटक

नवी दिल्ली : श्रीसन फार्मा कंपनीच्या कोल्ड्रिफ कफ सिरपच्या एका बॅचच्या निर्मिती प्रक्रियेत गंभीर गडबड झाली. सिरपमध्ये शरीराला अपायकारक घटक मिसळण्यात आले. हे औषध ज्या चिमुरड्यांना देण्यात आले त्यांची तब्येत बिघडल्याच्या तक्रारी येण्यास सुरुवात झाली. तब्येत खालावली आणि मध्य प्रदेशमधील २३ बालकांचा मृत्यू झाला. या प्रकरणाची सरकारी पातळीवर गंभीर दखल घेण्यात आली आहे. इथून पुढे कोणत्याही कफ सिरपची प्रत्येक बॅच तयार करण्याआधी त्याची चाचणी घेण्याचे बंधन सरकारने घातले आहे. महाराष्ट्र शासनाने राज्यात कोल्ड्रिफ कफ सिरपची विक्री थांबवण्याचे आदेश दिले आहेत. तसेच औषध विक्रेत्यांना कोल्ड्रिफचा साठा असल्यास कंपनीकडे परत पाठवून द्या, असे आदेश दिले आहेत. विषारी कफ सिरप प्रकरणी श्रीसन फार्माचे संचालक गोविंदन रंगनाथन यांना अटक करण्यात आली आहे. रंगनाथन गोविंदन हे चेन्नई येथील घर आणि कांचीपुरम येथील कारखान्याला कुलुप लावून पत्नीसोबत फरार झाले होते. मध्य प्रदेश सरकारने स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाने दोन दिवस तामिळनाडूतील चेन्नईत ठिकठिकाणी धाडी टाकल्या. पोलिसांनी रंगनाथन गोविंदन यांच्यावर 20 हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. अखेर गोविंदन रंगनाथन यांना अटक करण्यात आली. याआधी पाच ऑक्टोबर २०२५ रोजी छिंदवाडातील परासिया पोलीस ठाण्यात औषध निर्माता कंपनी श्रीसन फार्माचे संचालक मंडळ, बालरोजतज्ज्ञ डॉक्टर प्रवीण सोनी आणि इतर जबाबदार व्यक्तींविरोधात कलम १०५ आणि २७६ तसेच ड्रग्स अँड कॉस्मेटिक्स अ‍ॅक्ट १९४० अंतर्गत कलम २७ अ नुसार गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | ■ | धु | ■ | टो | क | दा | र |
| सा | ग | र | ■ | म | ■ | स | ई | प | रां | ज | पे | ■ | दा | स |
| ■ | न | ■ | द | ■ | वा | र | स | ■ | डे | रा | ■ | लू | ■ | वं |
| अ | म | री | श | पु | री | ■ | ■ | म | ■ | सं | क | ट | ■ | ती |
| ना | त | ■ | र | त | ■ | चौ | क | शी | ■ | ध | ■ | मा | घ | ■ |
| थ | ■ | र | थ | ■ | मा | का | ■ | द | र | ■ | खा | र | ■ | क |
| ■ | मो | द | ■ | क | ल | र | व | ■ | वा | ट | प | ■ | त | म |
| मे | ह | न | त | ■ | व | ■ | जी | व | न | ■ | र | ख | वा | ला |
| ह | र | ■ | ■ | क | ण | ख | र | ■ | गी | त | ■ | रू | ■ | ■ |
| बू | ■ | स | व | ड | ■ | प | ■ | उ | ■ | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | ■ | रा | ■ | उ | दा | ह | र | ण | ■ | श | र |
| ■ | त्न | ■ | रा | ज | धा | नी | ■ | स | ल | ■ | जी | व | ■ | बे |
| न | मा | ज | ■ | न्म | ■ | ल | ग्न | ■ | का | ■ | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | ■ | ना | म | ■ | भी | ■ | अ | ■ | पा | ■ | ■ |
| ली | ■ | त | ग | म | ग | ■ | स | म | ज | दा | र | ■ | शो | ध |



# धोक्याची घंटा!

## भारतात 5 वर्षांत हृदयरोगाचे प्रमाण 50 टक्क्यांनी का वाढले?

### मागील 5 वर्षांत हृदयरोगाच्या औषधांची मागणी 50 टक्क्यांनी वाढली; तरुणही धोक्यात!

मुंबई : गेल्या पाच वर्षांत भारतात हृदयरोगावरील औषधांची मागणी तब्बल ५० टक्क्यांनी वाढली आहे. एका अहवालानुसार, ही वाढ केवळ एक आरोग्यविषयक ट्रेंड नसून, सार्वजनिक आरोग्यासाठी एक गंभीर इशारा आहे. वेगाने बदलणारी जीवनशैली, वाढता ताण, खाण्याच्या चुकीच्या सवयी आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे तरुण आणि वृद्धांमध्ये हृदयरोग सामान्य झाले आहेत.

अपोलो हॉस्पिटलमधील कार्डिओलॉजी विभागाचे डॉ. वरुण बन्सल यांच्या मते, पूर्वी हृदयरोग साधारणपणे ५०-६० वर्षांनंतर होत असत, परंतु आता २५ ते ४० वर्षे वयोगटातील लोकांमध्येही उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्ट्रॉल आणि हृदयविकाराच्या झटक्यांची प्रकरणे वाढत आहेत. कोविड महामारीनंतर परिस्थिती आणखी बिकट झाली आहे, कारण संसर्गानंतर अनेक रुग्णांमध्ये कोविडनंतर हृदयरोगाच्या गुंतागुंत दिसून आल्या, ज्यासाठी बराच काळ औषधोपचार आवश्यक असतात. यामुळेच औषधांच्या वापरात मोठी वाढ दिसून आली.

याशिवाय, अलिकडच्या काळात रुग्णांमध्ये हृदयरोगाचा धोका लक्षात घेता डॉक्टरांनी प्रतिबंध म्हणून हृदयरोगाची औषधे लिहून देण्यास सुरुवात केली आहे. पूर्वी, जिथे १४०/९० मिमीएचजी (mmHg) हा उच्च रक्तदाब मानला जात होता, तिथे नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार, आता १२०/८० मिमीएचजी (mmHg) पेक्षा जास्त रक्तदाब देखील अलर्ट झोनमध्ये मानला जातो, ज्यामुळे पूर्वीपेक्षा जास्त लोकांना औषधांची आवश्यकता भासू लागली आहे.

### भारतात हृदयरोगाच्या औषधांची मागणी इतक्या वेगाने का वाढत आहे? यामागे अनेक चिंताजनक कारणे आहेत:

**वाढता धोका**

भारतातील प्रत्येक तिसरा मृत्यू हृदयरोगामुळे होतो. हृदयरोग आता केवळ वृद्धांपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर २५ ते ४० वयोगटातील तरुणांमध्येही वेगाने वाढत आहेत, ज्यामुळे औषधांची गरजही वाढली आहे.

**आधुनिक जीवनशैलीचे दुष्परिणाम**

आजची बैठी जीवनशैली, फास्ट फूडचे सेवन, झोपेचा अभाव आणि वाढता ताण हे उच्च रक्तदाब (उच्च रक्तदाब), कोलेस्ट्रॉल आणि लठ्ठपणा यासारखे वाढणारे घटक आहेत, जे हृदयरोगाची प्रमुख कारणे आहेत.

**लवकर निदान**

आता पूर्वीपेक्षा जास्त लोक आरोग्य तपासणी करून घेत आहेत. त्यामुळे आजाराचे लवकर निदान होते आणि रुग्णांना लवकर औषधे घेणे सुरू करता येते. वैद्यकीय सुविधा आणि चाचण्या आता गावांमध्येही पोहोचत आहेत.

**डॉक्टरांची वाढती सतर्कता**

आता हृदयरोगतज्ज्ञ आणि सामान्य चिकित्सक हृदयरोगाच्या जोखमीबद्दल अधिक सतर्क आहेत. ते लवकर प्रतिबंधात्मक औषधे देखील सुरू करतात जेणेकरून धोका कमी करता येईल.

**कोविड-19 चा प्रभाव**

कोविड-१९ नंतर अनेक रुग्णांमध्ये हृदयाशी संबंधित गुंतागुंत दिसून आल्या, ज्यामुळे रक्त गोठण्यास प्रतिबंधक आणि हृदयरोग प्रतिबंधक औषधांची मागणी आणखी वाढली.

**जागरुकता आणि सहज उपलब्धता**

वाढती जागरूकता आणि आरोग्य तपासणीची सहज उपलब्धता यामुळे निदानात वाढ झाली आहे. पूर्वी लोक हृदयरोगांकडे दुर्लक्ष करायचे, परंतु आता ईसीजी, बीपी, कोलेस्टेरॉलसाठी किरकोळ तक्रारी देखील तपासल्या जातात. यामुळे रुग्णांना लवकर उपचार आणि औषधे मिळण्यास मदत होते, जी एक चांगली गोष्ट आहे कारण लवकर निदान केल्याने हृदयविकाराचा झटका आणि स्ट्रोकसारख्या आजारांना प्रतिबंध करता येतो.

**संकट आणीबाणीचे स्वरूप घेऊ नये**

संतुलित आहार, नियमित व्यायाम, ताणतणाव व्यवस्थापन आणि पुरेशी झोप यांसारख्या बाबींवर लक्ष न दिल्यास, येत्या काळात हृदयरोग अधिक सामान्य होऊ शकतात. म्हणून आता केवळ औषधांवर अवलंबून न राहता, हृदय निरोगी ठेवण्यासाठी जागरूक जीवनशैली स्वीकारणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून हे संकट आरोग्य आणीबाणीचे स्वरूप घेऊ नये.

## केज शहरातील शासकीय कार्यालयामोरच तळीरामाचा भर रस्त्यात हैदोस!

● पान १ वरून... रस्त्यावर अनेक मोकाट जनावरे फिरतात, बसतात यामुळेही वाहतुकीचा खोळंबा होत असुन केज पोलीसांची गस्तीची गाडी नेमकी कशासाठी फिरत आहे. हे मात्र समजण्यास मार्ग नाही. रस्त्यावरील अशा अडथळ्यामुळे नागरिकांना व वाहन चालकांना रस्त्यावर नाहक त्रास सहन करावा लागत आहे, परंतु याकडे केज पोलिस मुग गिळुन गप्प का? आसा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

केज शहरांमध्ये व तालुक्यात गल्लीबोळामध्ये सर्रासपणे हातभट्टी दारू व देशी दारूची राजरोजपणे विक्री केली जात आहे. त्याचबरोबर शासकीय कार्यालयाच्या परिसरात राजरोजपणे मटका खेळला जातो. व घेतला जात आहे. शहरातील अनेक ठिकाणी बारा ते अठरा वर्षाखालील तरुण हे विविध प्रकारची नशा करत आहेत. सध्या शहरांमध्ये कॅरीबॅग मध्ये सोल्युशन टाकून नशा करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात निदर्शनास येत असून यासह अनेक प्रकारच्या नशा तरुण युवक करत असल्यामुळे अनेक तरुणांना स्वत:चा जीव गमवावा लागला आहे अनेकांचे संसार उघड्यावर आलेले आहेत. अशा जनसामान्यातून प्रतिक्रिया ऐकण्यास मिळत आहेत. अवैध व्यवसाय करणाऱ्यांना नेमका अभय कोणाचा आहे. असा जनसामान्यातून सवाल उपस्थित केला जात आहे. प्रशासन अवैध व्यवसायाकडे लक्ष देईल का? व्यसनापासून तरुणाची सुटका केली जाईल का? असा प्रश्न जनसामान्यातून उपस्थित केला जात आहे.

# भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख सामाजिक संरचनेचे शिल्पकार - डॉ. कमलकिशोर लड्डा

**माजलगाव : प्रतिनिधी**

सामाजिक संरचनेचे शिल्पकार भारतरत्न श्रद्धेय नानाजी देशमुख होते असे प्रतिपादन डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालयात माजी विद्यार्थी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित नानाजी देशमुख यांच्या जयंती व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी प्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की समाजाच्या व ग्रामीण भागाच्या सर्वत्रिक विकासासाठी नानाजी देशमुख यांच्या विचारांची सद्यस्थितीत गरज असल्याचे प्रतिपादन ही त्यांनी याप्रसंगी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी देखील आयुष्यभर समाजाची सेवा केली व एक आदर्श उभा केला तो आदर्श आजच्या पिढीने अंगीकारणे महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, नानाजी देशमुख यांनी जे आपल्या जीवनामध्ये कार्य केले ते आदर्शवत असे आहे. चित्रकूट या ठिकाणी त्यांनी जो प्रकल्प उभारला आहे तो आजच्या तरुणाई व समाजासमोर एक आदर्श व मूर्तीमंत असे उदाहरण आहे. प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. गजानन



होन्ना यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रमेश गटकळ यांनी केले तर आभार कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये, प्रा. अंकुश साबळे पर्यवेक्षक परमेश्वर खेत्री, कार्यालय श्री. विजय कुलकर्णी व महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## आण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर, व टिपू सुलतान यांचे स्मारक का नाही? - आझाद क्रांती सेनेचा सवाल

**माजलगाव : प्रतिनिधी**



माजलगांव शहरात दि १० ऑक्टोबर रोजी माजलगाव येथे परमपूज्य बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे भूमिपूजन होत आहे याचा आनंद मनात आहे. परंतु सत्यशोधक अण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर, व टिपू सुलतान यांचे स्मारक का नाही हा प्रश्न सत्तेतील राजकर्त्यांना आझाद क्रांती सेनेच्या वतीने विचारण्यात येतात येणाऱ्या नगरपालिका डोळ्यासमोर ठेवून महापुरुषांच्या स्मारकाचे राजकारण केल्या जात आहे. परमपूज्य बाबासाहेब आंबेडकर छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक शहरांमध्ये होणे ही सर्व समाजात आनंद उत्सव निर्माण करणारी व शहराच्या वैभवात भर पाडणारी बाब आहे. परंतु स्मारकाचे राजकारण व्हायला नको असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले आहे. सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकाची मागणी १९९९ पासून असताना देखील काय केले हा ही प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. अण्णाभाऊ साठे अहिल्याबाई होळकर यांच्या स्मारकासाठी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे, अहिल्याबाई होळकर व टिपू सुलतान अनुयायी यांना सोबत घेऊन निकरीचा लढा देण्यात येणार आहे. तसेच लवकरच अण्णाभाऊ साठे अहिल्याबाई होळकर व टिपू सुलतान यांच्यावरती प्रेम करणाऱ्या समाज बांधवांची बैठक घेऊन स्मारक समित्या निर्माण करून लढा तीव्र करण्यात येणार आहे. असे मत आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे यांनी व्यक्त केले आहे.

## छोटीवाडी येथे शेकापचा रास्ता रोको



**माजलगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील छोटीवाडी येथे मोठी वाडी चौकात आज दिनांक ११अक्टोबर रोजी सकाळी १० :०० वा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने भाई अॅड .नारायण गोले पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई, पुरग्रस्तांना एकरी लाख रुपये नुकसान भरपाई, संपूर्ण कर्जमाफी, १००% पिक विमा द्या, भूमिहीनांना २५ हजार रुपये सहानुभूती पर अनुदान द्या .या मागण्यासाठी तब्बल दिड तास रस्ता रोको आंदोलन करण्यात आले यावेळी आंदोलकांनी प्रचंड घोषणाबाजी केली त्यावेळी वाहनाच्या दुर दुर रांगा लागल्या होत्या.

यावेळी तहसील प्रशासनाने आंदोलकाच्या मागण्याचे निवेदन स्वीकारले. यावेळी पोलिस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## लऊळ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न; सद्‌गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चा उपक्रम

**माजलगाव : प्रतिनिधी**

अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पिठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशीर्वादाने सद्‌गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित माजलगाव तालुक्यातील लऊळ येथे मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.

या आरोग्य तपासणी शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्‌गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल चे डॉ मोहन गौरकर, डॉ कृष्णा खैरनार तसेच डॉ यशवंत राजेभोसले, डॉ अशोक घुबडे, सरपंच लक्ष्मण सरवदे, द्वारकादास शिंदे (चेअरमन- सेवा सहकारी सोसायटी), बारिकराव शिंदे (संचालक- सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना), अण्णासाहेब शिंदे (व्हाइस चेअरमन- सेवा सहकारी



सोसायटी), काशिनाथ सरवदे (सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक), रामभाऊ शिंदे (ग्रामसेवक), राजेंद्र भंडारी (संचालक- सेवा सहकारी सोसायटी), डॉ सीमा बाहेती, डॉ शिल्पा हुमारी तसेच परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटरची टीम उपस्थित होते. यावेळी डॉ मोहन गौरकर यांनी श्री स्वामी समर्थ सेवा मार्गाचे उपक्रम व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. या शिबीराचे प्रास्ताविक डॉ यशवंत राजेभोसले यांनी केले. या शिबिरात बीपी, शुगर, नाडी परीक्षण, इसीजी, फेजिओथेरेपी इत्यादी सुविधा मोफत देण्यात आल्या या शिबीराचा शहरातील शेकडो रुग्णांनी लाभ घेतला.

## शाळेसाठी बससेवा सुरळीत करा

## शुक्ल तिर्थ लिमगाव येथील विद्यार्थीचे आगार प्रमुखांच्या कार्यालयात ठिय्या

**सरकारला विद्यार्थ्यांच्या भविष्याची चिंताच नाही**

**कागदोपत्री विकास सुरू; प्रत्यक्षात छोट्या मागणींसाठी पालकांची दमछाक**



**अवकाळी पावसाने गावकरी हैराण; मुलांच्या शिक्षणाचाही होतोय खेळखंडोबा**

### बसची विद्यार्थ्यांना हुलकावणी; रस्त्याने येणारी बसही गावात येईना

**माजलगाव : प्रतिनिधी**

अवकाळी पावसाने गावकरी हैराण झालेले आहेत. जीव मेटाकुटीला आला असताना मुलांच्या शिक्षणाचाही खेळखंडोबा होताना दिसत आहे. रस्त्याने येणारी बसही गावात येईना झाल्याने येथील शुक्ल तिर्थ लिमगाव येथील विद्यार्थी प्राथमिक शिक्षणानंतर पुढील शिक्षणासाठी काही मुला मुलींना गावाच्या बाहेर जावे लागते.

यामध्ये साधारण ४०/५० विद्यार्थी मोगरा येथे शिक्षण घेतात .त्यासाठी लागणारी शालेय पास देखील बहुतांश मुला मुलींनी काढली आहे . परंतु या रस्त्याने येणारी बस गावात येत नसल्याने शालेय विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी अडचण निर्माण झाली त्याच अनुषंगाने वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सचिन भैय्या उजगरे यांनी कार्यलयास निवेदन दिले आहे.

विद्यार्थीची गैरसोय ही त्यांच्या शैक्षणिक अडचणीस कारणीभूत असल्याने शुक्ल तिर्थ लिमगाव येथील विद्यार्थी आगार प्रमुखांच्या कार्यलयात ठिय्या करत आमची बस सेवा सुरळीत चालू करा .अशी मागणी करत आहेत.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे सचिन भैय्या उजगरे, सिध्दार्थ पौळ, विष्णू शेरकर, स्वराज ससाने,प्रमुख आणि विद्यार्थी उपस्थित होते. सदरील बससेवा सुरु करण्यासाठी रोड सर्वे साठी कर्मचारी शैलेश जोशी गेले असुन तात्काळ बस सुरु करु असे आगर प्रमुख सुहास कोळपकर यांनी आश्वासीत केले आहे .

## प्रलंबित प्रश्नांसाठी कन्नड तालुक्यातील शेतकऱ्यांचा शासनाकडे आक्रोश

**कार्यवाही न झाल्यास संविधान पद्धतीने आंदोलन**

**सामाजिक कार्यकर्ते उदय गवळींचा इशारा**



**कन्नड :** कन्नड उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी कार्यालयात काल सामाजिक कार्यकर्ते उदय गवळी यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शासनाला आपल्या विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या निवेदनाद्वारे शेतकऱ्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले.

उदय गवळी यांनी सांगितले की, शासन व प्रशासनाने वारंवार मागण्या करूनही अद्याप ठोस कार्यवाही केली नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, "जर शासनाने लवकरच सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर आम्ही संविधान पद्धतीने आंदोलन करण्यास भाग पडू."कन्नड तालुक्यातील शिव पाणंद रस्त्यावरील संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचा आरोप करण्यात आला असून, सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करून ठेकेदाराचा परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या कामांमधील गैरव्यवहारांची चौकशी करावी . या सारख्या अनेक कामांमध्ये देखील भ्रष्टाचार झाल्याचे आरोप निवेदनात करण्यात आला आहेत .तसेच तालुक्यातील शिवरस्ते मोकळे करणे, संबंधित ठिकाणावरील अडथळे दूर करून रस्ते जनतेसाठी खुले करण्याची मागणी संबंधित आंदोलकांनी केली .या सर्व मागण्यांबाबत शासनाने तात्काळ ठोस कार्यवाही करावी, अशी मागणी उदय गवळी यांनी केली. त्यांनी सांगितले की, "शेतकरी हा देशाचा कणा आहे. पण आज त्यालाच न्यायासाठी लढावे लागत आहे. आम्ही शांततेच्या मार्गाने न्याय मागत आहोत, पण दुर्लक्ष झाले तर संविधान पद्धतीने आंदोलन छेडले जाईल.

**ज्ञान आणि कल्पकतेचा संगम** ➤ **महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी नोंदवला सहभाग**

# गुरुकृपा महाविद्यालयात राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण स्पर्धा

**माजलगाव : प्रतिनिधी**

फार्मसी विद्याशाखेमध्ये लोकप्रिय असलेल्या राज्यस्तरीय भित्तीपत्रक सादरीकरण (पोस्टर प्रेझेंटेशन) स्पर्धेचे आयोजन गुरुकृपा इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, माजलगाव महाविद्यालयात भव्य स्वरूपात करण्यात आले.

या वेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील फार्मसी कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला. सदरील कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुकृपा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी केले या कार्यक्रमासाठी ग्लेनमार्क फार्मास्युटिकल या नामांकित औषधी कंपनीचे मुख्य संशोधक वैज्ञानिक श्री अलकेश कासलीवाल यांची खास प्रमुख उपस्थिती लाभली. भित्तीपत्रकाचे निरीक्षणे संपल्यानंतर येथे पारितोषिक वितरण समारंभ पार पडला यात डीफॉर्मसी आणि बीफार्मसी विभागात स्वतंत्र पाच हजार, तीन हजार, दोन हजार रोख व सन्मानचिन्ह बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गुरुकृपाचे प्राचार्य अमित बिंदू यांनी केले तसेच संस्थेचे अध्यक्ष डॉ. यशवंत राजेभोसले यांनी मंचावरून सहभागी विद्यार्थ्यांशी संवाद साधला यावेळी पुरुषोत्तम करवा, सुभाष नाकलगावकर, हरीश यादव आदी पत्रकार उपस्थित होते.

